RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ७, अंक ६४]    गुरूवार, डिसेंबर २, २०२१/अग्रहायण ११, शके १९४३    [पृष्ठ १, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १००**

**प्राधिकृत प्रकाशन**

**पाचोरा नगरपरिषद कार्यालय, पाचोरा**

क्रमांक बांध/१९६३/सन २०२१

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये अधिसूचना**

पाचोरा शहराची दुसरी सुधारीत + वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, निर्णय क्रमांक टीपीएस-३५१०/२७७२/प्र.क्र.१८६/२०११/नवि-९, दिनांक ३ एप्रिल २०१२ अन्वये भागशः तसेच निर्णय क्रमांक टीपीएस-३५१२/३०१(न)/प्र.क्र.३२(ब)/२०१३/नवि-९, दिनांक २० फेब्रुवारी २०१५ अंतिम मान्यता मिळाली असून सदर भागशः मंजूर विकास योजना दिनांक १५ मे २०१२ पासून अंमलात आलेली आहे.

नगरपरीषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३२ दिनांक ३ ऑगस्ट २०२१ अन्वये सदर मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये खालील प्रमाणे किरकोळ बदल करणेचे ठरविले आहे.

पाचोरा शहराच्या दुसरी सुधारीत + वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील सर्व्हे नंबर ३५ पैकी (गट नं.१०८ पैकी) खाजगी मालकीच्या जमिनीवर आरक्षण क्र. ४१ नुसार “ प्ले ग्राऊंड ” वापरासाठी ०.९० हेक्टर क्षेत्राचे प्रस्तावित आरक्षण वगळून सदर जमिनीचा वापर रहिवास प्रयोजनासाठी करण्याचा इरादा आहे.

नगरपरीषदेने प्रस्तावित केलेला बदल दर्शविणारा नकाशा म.अध्यक्षांचे सही, शिक्क्यानिशी व दिनांक सहित नगरपरीषद कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ ठेवणेत आला आहे. त्याबाबत कोणास सूचना अथवा आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी ही नोटीस **महाराष्ट्र शासन राजपत्र** तसेच स्थानिक व जिल्हा पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत निम्न स्वाक्षरीकार यांचेकडेस लेखी पाठवाव्यात. वरील मुदतीमध्ये आलेल्या हरकती व सुचनांचा विचार प्रस्तावित बदल महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यापूर्वी नगरपरीषदेमार्फत करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| | **संजय नाथालाल गोहिल,** | **श्रीमती शोभा भगवान बाविस्कर,** |
| पाचोरा, | अध्यक्ष, | मुख्याधिकारी, |
| दिनांक २ डिसेंबर २०२१. | पाचोरा नगरपरिषद, पाचोरा. | पाचोरा नगरपरिषद, पाचोरा. |



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.